नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 24/10/2020 (शनिवार)
(सकाळ)

---

## जबर दुखापत

1) पो.स्टे. कुही:– अंतर्गत 28 कि. मी अंतरावर सालई मेंढा येथे दिनांक 23/10/2020 चे 19:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिगांबर अंबर काळे, वय 36 वर्ष रा. सालई मेंढा.ता.उमरेड यांच्यावर उदार असलेले 20 रू. न दिल्याच्या कारणावरून आरोपी नामे– नंदु गुज्जर, रा. सालई मेंढा याने फिर्यादीस लाकडी काठीने डोक्यावर, चेहऱ्याच्या डाव्या भागास, डाव्या हातावर व डाव्या पायावर मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटुन रक्त निघाले व चेहऱ्याच्या डाव्या भागास जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 326 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार दिलीप लांजेवार पोस्टे.कुही मो.क्र. 9168522014 हे करीत आहे.

## आरोपीकडून मोटर सायकला आग

पो.स्टे.काटोल :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील अर्जुन नगर येथे दिनांक 22/10/2020 चे 20.20 वा. ते 20.30 वा. दरम्यान आरोपी नामे– पिन्टू वानखेडे, रा. घोडे प्लॉट काटोल व सोबत असलेला एक अनोळखी ईसम हे दोघेही आशोक वाळके याला हातबुक्कीने व काठीने मारहाण करीत असतांना फिर्यादी नामे– ईब्राहीन जाफर पठान वय 55 वर्ष, रा धंतोली काटोल हे झगडा सोडविण्यास मध्यस्ती आले असता त्यांना सुध्दा आरोपीतांनी काठीने मारहाण केली. तसेच फिर्यादीची एमएच– 40/3047 क्रमांकाची मोटरसायकल तसेच अशोक वाळके ची मोटरसायकल दोन्ही मोन्ही मोटरसायकल एकुण किमत 35,000/– रू. चे जाळुन नुकसान झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 435, 324, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. जवाहर चव्हाण 9545362131 हे करीत आहे

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर